# क-प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे 'ॲक्शन मोड'मध्ये!

## आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वातील युवा नेतृत्वाचा प्रशासनावर प्रभावी ठसा

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**भारतीय जनता पार्टीचे मोशी प्रभाग क्रमांक २ मधील नगरसेवक तथा 'क' प्रभाग (विजयदुर्ग) अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे यांनी पदभार स्वीकारताच कामाचा धडाका सुरू केला असून, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी थेट क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून जनसंपर्क आणि समस्यांच्या निवारणाला प्राधान्य दिले आहे. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच त्यांची 'क' प्रभाग अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली असून, त्यानंतर त्यांनी नागरिकाभिमुख कामाला सुरुवात केली आहे.**



> "'क' प्रभाग अध्यक्ष म्हणून मिळालेली जबाबदारी ही माझ्यासाठी केवळ पद नसून, नागरिकांची सेवा करण्याची मोठी संधी आहे. आमदार महेश लांडगे यांच्या नेतृत्वाखाली 'विकास आणि विश्वास' हे सूत्र घेऊन आम्ही काम करीत आहोत. प्रभागातील प्रत्येक नागरिकाचा प्रश्न हा माझ्यासाठी महत्त्वाचा असून, त्याच्या निराकरणासाठी प्रशासनाशी सातत्याने समन्वय साधला जाईल. नागरिकांना कोणत्याही कामासाठी हेलपाटे मारावे लागू नयेत, त्यांच्या समस्या वेळेत मार्गी लागाव्यात आणि महापालिकेच्या सेवा त्यांच्या दारापर्यंत पोहोचाव्यात, यासाठी मी कटिबद्ध आहे. 'क' प्रभागातील विकासकामांना अधिक गती देत नागरिकाभिमुख आणि पारदर्शक प्रशासन उभे करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू."
>
> – **निखिल बोऱ्हाडे, अध्यक्ष, 'क' प्रभाग (विजयदुर्ग), भारतीय जनता पार्टी.**

'क' प्रभाग (विजयदुर्ग) क्षेत्रीय कार्यालयात उपस्थित राहून निखिल बोऱ्हाडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि कामकाजाला सुरूवात केली. यावेळी परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, कचरा समस्या तसेच इतर नागरी सुविधांबाबत नियोजन करण्यात आले. आगामी काळात नागरिकांच्या तक्रारींचे गांभीर्य लक्षात घेत बोऱ्हाडे यांनी काही तातडीच्या प्रश्नांवर संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ सूचना देऊन अनेक प्रश्न जागेवरच मार्गी लावले. तर उर्वरित कामांची लवकरात लवकर विल्हेवाट लावण्याचे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. नागरिकांना शासकीय व महापालिकेच्या सेवा वेळेत मिळाव्यात आणि त्यांच्या अडचणींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यात समन्वय निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला.

राजकारणापेक्षा जनकारणाला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून निखिल बोऱ्हाडे यांनी मोशी परिसरात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. भाजपाचे शहरातील प्रभावी नेतृत्व आणि आमदार महेश लांडगे यांचे निकटवर्तीय सहकारी म्हणून ते सातत्याने विकासकामांच्या पाठपुराव्यासाठी ओळखले जातात. 'क' प्रभाग अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर नागरिकांच्या प्रश्नांसाठी ते अधिक सक्रिय झाले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांशी समन्वय साधत प्रभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी विशेष नियोजन सुरू केले आहे. नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची नोंद घेऊन त्यावर कालमर्यादित कार्यवाही करण्यासाठी ते स्वतः पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. निखिल बोऱ्हाडे म्हणाले की, "प्रभागातील प्रत्येक नागरिकाला प्रशासकीय सेवा वेळेत मिळाव्यात आणि त्यांच्या अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी आमचे प्रयत्न निरंतर सुरू राहतील. नागरिकांनी मांडलेला प्रत्येक प्रश्न हा आमच्यासाठी प्राधान्याचा विषय आहे. लोकप्रतिनिधी म्हणून नागरिकांच्या विश्वासाला पात्र ठरत विकासकामे आणि जनहिताच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम करत राहू." पदभार स्वीकारताच नागरिकांच्या प्रश्नांवर थेट क्षेत्रीय कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांशी समन्वय साधत प्रश्न सोडविण्याच्या निखिल बोऱ्हाडे यांच्या कार्यपद्धतीमुळे 'क' प्रभागात भाजपच्या नागरिकाभिमुख कारभाराची प्रभावी सुरुवात झाल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविणे, पारदर्शक प्रशासन आणि विकासकामांना गती देणे, हाच आपल्या कार्याचा प्रमुख उद्देश असल्याचेही निखिल बोऱ्हाडे यांनी यावेळी अधोरेखित केले.

# वल्लभनगर भुयारी मार्ग देतोय अपघाताला निमंत्रण; भुयारी मार्गाची दुरवस्था

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले होते. वल्लभनगर येथील भुयारी मार्गात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने प्रशासनाने हा मार्ग काही काळ वाहतुकीसाठी बंद केला होता. पाण्याचा उपसा करून मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. मात्र, पाणी ओसरल्यानंतर या भुयारी मार्गाची दुरवस्था समोर आली.**





मोठमोठे खड्डे, उघडी पडलेले चेंबर्स आणि गाळाने तुंबलेले पावसाळी नाले यामुळे हा मार्ग अपघातांना निमंत्रण देत आहे.

पावसाच्या पाण्यामुळे भुयारी मार्गातील डांबरी रस्ता ठिकठिकाणी उखडला असून, मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्यावर खडी व माती पसरल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. थोडा पाऊस झाला तरी भुयारी मार्गात पाणीच पाणी होते. विशेषतः दुचाकीस्वार आणि रिक्षाचालकांना खड्डे चुकविताना वाहनावरील ताबा सुटण्याची शक्यता आहे.

भुयारी मार्गाच्या कडेला असलेल्या पावसाळी पाणी वाहून जाणाऱ्या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचला आहे.

त्यामुळे पुन्हा पाऊस झाल्यास पाण्याचा निचरा सुरळीत होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यातच काही ठिकाणी पावसाळी चेंबरची झाकणे गायब झाली आहेत. त्यामुळे रात्रीच्या वेळी ही उघडी ठिकाणे वाहनचालकांच्या लक्षात न आल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता आहे.

## प्रशासन अपघाताची वाट पाहत आहे का?

पाणी साचल्यावर भुयारी मार्ग बंद केला जातो आणि पाणी ओसरल्यानंतर उखडलेल्या रस्त्यावरून प्रवास करण्याची वेळ नागरिकांवर येते. खड्डे चुकविताना वाहने घसरतात. रात्रीच्या वेळी उघडी चेंबर्स दिसत नाहीत. प्रशासन एखादा मोठा अपघात होण्याची वाट पाहत आहे का?' असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक व वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

## तातडीने उपाययोजनांची मागणी

- भुयारी मार्गातील खड्ड्यांचे तातडीने डांबरीकरण किंवा पॅचवर्क करावे.
- गायब झालेल्या पावसाळी चेंबरवर नवीन झाकणे बसवावीत.
- नाल्यांमधील गाळ काढून पाण्याचा निचरा सुरळीत करावा.
- अपघात होण्यापूर्वी महापालिका प्रशासनाने तातडीने दुरुस्ती करावी.